# राशिभविष्य - मे, २०२३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि, बुध, गुरु, राहू, हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनारोग्यकारक होईल. तसेच कसली तरी चिंता त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच वाद, भांडणे होतील व डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. बुधामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होणे संभवते. शिवाय धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. पण गुरु ग्रह अनुकुल होईल व आरोग्य सुधारेल. तसेच तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. येथील हर्षलमुळे स्वभाव लहरी, अस्थिर, चंचल असा घडेल व कोणाचा धाक, दडपण सहन होणार नाही. पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. राहूमुळे वातविकाराचे अनारोग्य होणे संभवते. पण त्याच्यामुळे अपमान होणेही संभवते. तसे झाल्यास मनात सूडभावना प्रज्वलित होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल. पण त्याच्यामुळे दुखापत होणेही संभवते. शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काहींना प्रतिष्ठा, सन्मान , धनलाभ प्राप्त होईल. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे शुभकारक होईल; पण त्याच्यामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मानसिक व्यग्रता होणे संभवते. तसेच एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यताही दिसते. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण तो गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा

असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओमअश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत रवि, बुध, गुरु, हर्षल व राहू असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे अनारोग्य होणे, कसली तरी चिंता त्रस्त करीतसे दिसते. शिवाय थकवा येणेही संभवते. बुधामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, अनारोग्य होणे संभवते. गुरुमुळे अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच समाजसेवेत कार्यरत असणारांनाही तो अनुकुल व यशदायक होईल. पण त्याच्यामुळे प्रवासात त्रास, अडचणी निर्माण होणे संभवते. तसेच कौटुंबिक त्रास होणे संभवते. हर्षलमुळे वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल, सांपत्तिक अडचणी निर्माण होतील व शत्रुत्व निर्माण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अपघातभयही असून बेअब्रूचे प्रसंगही निर्माण होणे संभवते. राहूमुळे दिखाऊ आचरण कराल, पण तो अर्थदायक होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून
येथील मंगळामुळे उष्णताविकाराचे अनारोग्य होणे संभवते. तसेच आर्थिक चिंताही अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. पण शुक्रामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल व धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामूळे आचारविचार उच्च होतील आरोग्य उत्तम राहील, मनस्थिती उदार होईल व काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे कुमार्गी मित्रामुळे मनस्ताप सहन करावा लागेल, आर्थिक समस्या त्रस्त करतील व त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा,

ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ  व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या दिनांक १० पासून  या राशीच्या धनस्थानी  कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार असतील आणि अकारण श्रम, दगदग कराल. नोकरदार मंडळींना नोकरीत मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या पंचम स्थानी केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ  या स्वराशीत  शनि  असून तो सर्वसाधारण्पणे अनुकुल होईल व तो चिकित्सक  बौद्धिक कार्यक्षेत्र  व वकिली व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच दूरच्या प्रवासाचे योग येतील.  या राशीच्या दशम  स्थानी मीन राशीत नेपच्यून असून  त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल; पण  तो मनोवैज्ञानिक  व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल  व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष  राशीत रवि, बुध, गुरु, हर्षल, राहू असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत जात आहे.  त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसाय असणारांना  अनुकुल  व लाभदायक होईल.  आरोग्य उत्तम राहील व क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल  परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, अनारोग्य होणे संभवते. मानभंग होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.  येथील बुधामुळे सुखसमाधान लाभेल. नवे मित्र मिळणेही संभवते. येथील गुरुमुळे  इच्छाआकांक्षा  पूर्ण होतील,  धनलाभ होईल, विवाहेच्छूना विवाहयोग येईल. येथील हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित  असेच घडेल. मित्रांशी भांडणे होतील, येथील राहूमुळे नोकरीत अधिकार पद असणारांपैकी काहींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह निर्माण होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून  तो विचार मनातून काढून टाकावा. श्रद्धा असेल तर मनापासून श्रद्धेने शिवोपासना व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी  दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  “शिवलीलामृत स्तोत्रा”चे  व “दुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा,  ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओंमः शंकराय नमः:”  तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या व्ययस्थानी मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण काळात प्रतिकुलच होणार असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार असतील, शरीरपीडा, दगदग कराल, मन अस्वस्थ राहील व कसली तरी चिंता त्रस्त करीतसे दिसते. पण व्ययस्थानी असलेल्या शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतु असून तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे घरात कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील, शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे खाण्यापिण्यात जपावे लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत शनि असून तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. काही मंडळींना एखादा विचित्र आजार त्रस्त करील, तर काहींना दु:ख, दैन्य देण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. शिवाय काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत रवि -बुध -गुरु -राहू-हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायकच होईल. येथील बुध -गुरु -हर्षल व राहू हे चारही ग्रह सुद्धा अनुकुलच होतील व बौध्दिक, उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना ते अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होतील. नोकरीत कोणास अधिकारपद तर कोणाचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण कसली तरी मानसिक चिंता त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील; पण या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे

उघड्यावरचे पदार्थ  खाऊ  नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत रवि -बुध -गुरु -हर्षल -राहू असे पाच ग्रह असून येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात  प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, कसली तरी भीती, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल व  त्यामुळे नैराश्य येणे  संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो नोकरी-व्यवसायास अनुकुल  होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना अधिकार पद  मिळू शकेल.  आर्थिक लाभ होईल, व्यवसायात प्रगती होईल व  क्वचित कोणास एखादे  उच्च पद  मिळणेही संभवते. बुधामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, दिरंगाई  होणे, वाद, भांडणे होणे संभवते. पण गुरुमुळे उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे  शक्य होईल. तसेच या  गुरुमुळे गुणवंतांना आपले गुण  व्यक्त करण्यास संधी मिळेल. त्यातून काही गुणवंतांना प्रसिद्धी मिळणेही संभवते. शिवाय  प्रवास योगही येईल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर  काहींना परदेशगमनाचे योग येतील. येथील राहूमुळे सभाधीटपणाचा  गुण प्राप्त होईल, तसेच फिरती नोकरी  असणारांना  तो लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत मंगळ  व शुक्र असे दोन ग्रह असून  येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे  मैत्रीत  मैत्रीत वितुष्ट  येणे संभवते.  कष्ट, परिश्रमानेच अर्थलाभ होईल,  पण क्वचित कोणास एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. पण तो व्ययस्थानी  गेल्यावर पूर्णपणे प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे चिंता, मानसिक त्रास, आर्थिक  चिंता,  मानहानी होणे संभवते. जपा. पण लाभस्थानी असलेला शुक्र पूर्णपणे अनुकुल होईल व  अर्थलाभ होऊन सुखशांती लाभेल, श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल.  त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम  स्तोत्रा"चे  पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -**  या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतु  असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त  करतील. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी  कुंभ  राशीत  शनि  असून त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच अनारोग्याचा त्रासही संभवतो. पण तो  दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन  राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते.  या राशीच्या अष्टम सथानी मेष राशीत रवि-बुध -गुरु-हर्षल-राहू असे पाच ग्रह असून येथील रवि

महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत जात आहे . अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, हाती घेतलेल्या कार्यात अपयश, संततिसुखात बाधा, मानसिक ताण, भय, निराशा, वडील मंडळींचा विरोध अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. पण बुधामुळे कार्यसिद्धी होऊन यश प्राप्त होईल. गुरुमुळे जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असणारांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होणे संभवते. राहूमुळे वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह निर्माण होईल. जपा. येथील हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणेच अगत्याचे होईल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत जात आहे. येथील मंगळामुळे नोकरी -व्यवसाय काहीही असणारांच्या कार्यक्षेत्रात खळबळजनक घटना घडतील. कामाचा असह्य ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. मित्राशी वितुष्ट येईल. प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मनस्ताप होणे संभवते. पण काही मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू प्राप्त होणे संभवते. येथील शुक्र प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. त्यामुळे दु:ख होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो अनुकुल व सुखदायक होईल. पण त्याच्यापासून वाहनधोका असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे बुद्धी संशयी, स्वार्थी होणे संभवते. पण तो चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे काही मंडळींना उगीचच एखादी आजार भावना त्रस्त करील. काहींना एखादी काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. किंवा फसवणुकीचा त्रास होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत रवि -बुध - गुरु- राहू - हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परीस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, अनारोग्य होईल, संततिसुखात बाधा पडेल. दु:ख, अपयश

सहन करावे लागेल. बुधामुळे भांडणे होतील व दु:ख होईल. गुरु अनुकुल  होईल व त्याच्यामुळे काही विवाहेच्छूना  विवाहयोग येईल, प्रेमसंबंध असणारांचे प्रेमसंबंध  दृढ होतील, नवे स्नेहसंबंध जुळून येतील व अर्थलाभही होणे संभवते. राहूमुळे मनात कपटी  विचार प्रबळ होतील, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल, हर्षलमुळेही विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या दशम स्थानी  कर्क राशीत  जात आहे. येथील मंगळामुळे प्रवासात त्रास व मनस्ताप सहन  करावा लागेल. जपा. पण तो या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत गेल्यावर व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरदार मंडळींना कामाचा ताण  व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल, काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि  येईल,  पण शुक्रामुळे थोरामोठ्याचा  कृपाप्रसाद लाभेल,  सुसंगती लाभेल, ऐषाराम लाभेल, क्वचित कोणास प्रसिद्धी प्राप्त होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे  पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे  पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र  विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये  नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या  राशीच्या चतुर्थ स्थानी स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात  बाधा पडणे संभवते. त्यातून नैराश्य येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल; पण गूढ संशोधन आणि अध्यात्म यांची मनापासून आवड असणारांना तो अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती प्राप्त करणे शक्य होईल. तसेच  गूढ संशोधनात प्रगती होईल व यश लाभेल.  या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत रवि -बुध -गुरु -राहू- हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत  महिन्याच्या  पूर्वार्धात  तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल व हितशत्रू पराभूत होतील. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो केंद्रस्थानी असल्यामुळे  भाग्योदयकारकही  होऊ शकेल.  बुधामुळे कार्यसिद्धी होईल, धनलाभ होणेही संभवते. गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील, राहू परधर्मियांशी  व्यावसायिक संबंध असणारांना  अनुकुल  व लाभदायक होईल; पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. हर्षलमुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा त्रास

होणे संभवते. सबब सतत खोल विचार करत बसू  नका. मेंदूला  विश्रांती द्या. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत अनारोग्यकारक होईल, व त्याच्यामुळे हाडमोड होणेही संभवते. जपा. शिवाय तो जलभयकारक आणि विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच उघड्यावरचे  खाद्यपदार्थ खाऊ नका.  शिवाय  प्रवासही करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. . पण येथील शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल.  काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा  अधिक अर्थलाभ होईल. या  राशीच्या व्यय स्थानी  तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी असा होणे संभवते.  श्रद्धा असेल तर  श्रीगणेश  व श्रीहनुमान उपासना अनुकुल  होईल व मन:शांती लाभेल.  त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर  मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष  स्तोत्रा”चे पठण  करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी  “हनुमानचालिसा  स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र  विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:”  तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी त्यांनी “ओम इंद्राय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या  राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत शनि  असून त्याच्यामुळे काही मंडळींना  उत्तम नोकरी तर काही मंडळींना  आवडते  कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे  भावंडविषयक  एखादी चिंता  त्रस्त करीलसे दिसते. या राशीच्या  चतुर्थ स्थानी मीन  राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत रवि -बुध -गुरु-राहू-हर्षल  असे पाच  ग्रह असून येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी  वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, अपघात होणे, नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे, संततीपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे अशापैकी घटना घडणे संभवते.  पण महिन्याच्या उत्तरार्धात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक  होईल; पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते.  येथील बुधामुळे बुद्धी मंद होईल व संतति, स्त्रीपासून  त्रास होणे, भय वाटणे संभवते. येथील गुरु सर्व प्रकारे अनुकुल  व लाभदायक होईल व त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, अर्थलाभ होईल व सर्व सुखाचेच घडेल.  पण राहूमुळे संततिसुखात बाधा निर्माण होणे संभवते. येथील हर्षल  मात्र उच्च, चिकित्सक बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना  अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक

होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, भागीदारी व्यवसायात वाद, गैरसमज निर्माण होणे संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय तो जलभयकारक व वीजभयकारक असल्यामुळे विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा व खोल पाण्यात पोहू नका. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शुक्रामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील व विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल व सुखकारकच होईल. हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल व खूप प्रवास होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्र स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर-** या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडणे संभवते. जपा. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल; पण तो अध्यात्म व गूढ संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत रवि -बुध -गुरु -राहू-हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, कार्यदिरंगाई, अपघात, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता, प्रिय जणांपैकी कोणाचा होणारा दुरावा अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल; पण आर्थिक नुकसान होण्याची शक्यताही जाणवते. गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार पार पडतील; पण नातलग मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. राहूमुळे कौटुंबिक कटकटी, त्रास, अपयश व अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच येथील हर्षलमुळे कशातही सुखसमाधान लाभणार नाही, कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल व त्यामुळे वास्तुसुख

मिळणार नाही. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो अनारोग्यकारकच होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेल. त्याशिवाय चोरी होणे, आर्थिक नुकसान होणेही संभवते. शिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारी तुटणार नाही याची काळजी घ्यावी. शुक्रामुळे केवळ स्वतः:जवळ असलेल्या कलेचा छंद म्हणून आनंद घेता येईल; पण कलाकार म्हणून प्रसिद्धी मिळणे संभवत नाही. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल; पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच मनापासून करावी. श्रद्धा असेल तर "शिवशंकराची " व "हनुमानाची" उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून तो स्वराशीत असला तरी प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, कुटुंबातील कोणाचे दूरत्व निर्माण होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत रवि -बुध - गुरु -राहू-हर्षल असे पाच ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व सुखसमाधान लाभेल, नोकरीत वरिष्ठ प्रसन्न होतील, क्वचित कोणाचा सन्मान होणे तर कोणास एखादे उच्च पद प्राप्त होणे संभवते. पण महिनाच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होणे संभवते. तसे घडल्यास त्याच्यामुळे अनारोग्य होणे, दु:ख, नैराश्य येणे, कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. बुधामुळे शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. गुरु ग्रह या राशीच्या लेखक मंडळींना अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील, पण भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. राहूमुळे हातून काही कर्तृत्व घडेल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व

यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाचे योगही येतील. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संततीविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय अनारोग्य होणे, इजा होणे, अपप्रचाराचा त्रास होणेही संभवते. पण येथील शुक्र सर्व प्रकारच्या कलाकारांना अनुकुल, प्रगतिकारक व सुखदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे हातून ढोंगी, धूर्तपणाचे आचरण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यताही जाणवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची" व "हनुमानाची " उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत रवि - बुध -गुरु - राहू - हर्षल असे पाच ग्रह असून यथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे भांडणे होतील, डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते व आर्थिक समस्या त्रस्त करणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व सर्व काही सुखाचेच घडेल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील, क्वचित कोणाचा सन्मान होईल किंवा कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. बुधामुळे दु:ख प्राप्त होईल; पण धनलाभ होणेही संभवते. गुरुमुळे कौटुंबात शुभ घटना घडतील, आर्थिक लाभ होतील, नोकरी-व्यवसायात प्रगती होईल. पण राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, भांडणे होतील. शिवाय आर्थिक चिंताही त्रस्त करण्याची शक्यताही जाणवते. हर्षलमुळे मनस्थिती अति अस्थिर, लहरी, चंचल होईल व हातून विचित्र आचरण घडणेही संभवते. तसेच आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचे मन दुखावले जाईल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक १० पासून या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्यामुळे मंगळ संपूर्ण महिन्याच्या काळात कौटुंबिक सुख आणि संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच असमाधानकारक घटनाही घडण्याची शक्यता दिसते. स्थावर संपत्ती असेल तर त्यापासूनही त्रास होणे संभवते. तसेच संततीपैकी

कोणाचे अनारोग्य, कोणाचे गैर आचरण अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा पडणे संभवते. पण शुक्रामुळे शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. ऐषाराम लाभेल व विवाहयोग येईल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळेअनारोग्य होणे, कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा पडणे,अपघात भय असणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ या स्व राशीत शनि असून त्याच्यामुळे संकटपरंपराच कोसळण्याची शक्यता दिसते. अनारोग्य होणे, आर्थिक संकटे कोसळणे, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====०००0०००=====